**(निशाणी ३१ वरील आदेशान्वये प्रतिवादी क्र. २ तर्फे वकीलामार्फत उलटतपास नोंदविण्यास परवानगी देण्यात आली आहे.)**
**सबब वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास प्रतिवादी क्र. २ चे वकिल श्री. डी. व्ही. फुसे यांचे मार्फत शपथेवर सुरू —**

९. हे म्हणणे खरे नाही की मी माइया पुराव्याच्या शपथपत्रात असे चुकीचे व खोटे नमुद केले आहे की या दाव्यातील मालमत्ता क्रमांक अ ते क या वडीलोपार्जीत मिळकती असुन त्यावर माझा वारसा हक्क व अधिकार आहे. मी मुंडगाव येथे जात—येत असते. माइया आजोबांचे वय हे अंदाजे ८५ वर्षापेक्षा अधिक आहे. हे मला माहित नाही की त्यांच्या वैद्यकिय उपचाराकरीता खर्च लागतो. हे म्हणणे खरे नाही की माझे आजोबा हे आजारी असतात व त्यांना औषधोपचाराकरीता पैशांची गरज होती म्हणुन त्यांनी या प्रकरणातील मालमत्ता क्रमांक अ ही प्रतिवादी क्रमांक २ यांना विक्री केली आहे.

१०. हे म्हणणे खरे नाही की या दाव्यातील वादमिळकती हया माझे पण्जोबा महादेव फुसे यांच्या मालकीच्या होत्या आणि महादेव फुसे यांच्या मृत्युनंतर सदर मिळकती माझे आजोबा मोतीराम फुसे यांचे नावाने वारसा हक्काने नोंदविण्यात आल्या असे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की माइया देखभालीकरीता प्रतिवादी क्र. १ यांनी मला पैसे पुरविलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी माइया मामाकडे राहते असे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की सद्या माझे शिक्षण सुरू असुन मला माइया शिक्षणाकरीता तसेच माइया वैयक्तीक विकासाकरीता माझे वडीलोपार्जीत मिळकतीत असणा—या हिश्याची गरज आहे असे मी माइया पुराव्याच्या शपथपत्रात खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की माइया आजोबांनी माझे काका प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्या नावाने नोंदणीकृत बक्षिसपत्राने व खरेदीखताने वादमिळकतींची विल्हेवाट लावली आहे असे मला कागदपत्राबाबत चौकशी केली तेव्हा कळाले असे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर बक्षिसपत्र व खरेदीखत हे पूर्णतः खोटे व बनावटी असुन ते माइयावर बंधनकारक नाही असे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र. १ यांनी वादमिळकतीमधील असलेला माझा वडीलोपार्जीत कायदेशीर हिस्सा डावलण्याकरीता

खोटे व बनावटी खरेदीखत प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांचे नावे करून दिले आहे व ते दस्त नोंदवितांना माझी कसलीही संमती घेण्यात आलेली नाही असे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की वादमिळकतीत माझा एक चर्तथांश हिस्सा असल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांना वादमिळकतीमध्ये कसलाही हक्क नसतांना खोटे व बनावटी खरेदीखत व बक्षिसपत्र प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे नावे करून ठेवले आहे असे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की वादमिळकतीमध्ये माझा असलेला कायदेशीर हिस्सा डावलण्याकरीता प्रतिवादींनी खोटे व बनावटी खरेदीखत आणि बक्षिसपत्र नोंदविलेले आहे असे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी या प्रकरणात खोटे दस्ताऐवज व पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले असुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

११. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र. २ हे मागील ३५ वर्षापासुन मुंबई येथे राहतात म्हणुन त्यांचा या प्रकरणातील मालमत्तेशी काही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र. १ हे आजारी असल्यामुळे त्यांना औषधोपचाराकरीता पैशांची गरज होती म्हणुन त्यांनी या प्रकरणातील मालमत्ता क्रमांक १ ही प्रतिवादी क्र. २ यांना रूपये १०,००,०००/— या मोबदल्यात नोंदणीकृत खरेदीखताने विक्री केली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी प्रतिवादींविरूध्द खोटा दावा दाखल करून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास नाही.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—

दि. ०४.०४.२०२५.

( महेश एस. काळे )
**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट**